म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. 8238

IRBK-0108238
IRBK-0108238

# चांदीची झांज

★

लेखक

भालचंद्र पाठक [ वैद्यवाडी ]

अनुक्रम
विभाग
क्रमांक २७६७
नों. दि.

IRBK-0108238

ताडदेव बुक डेपो, मुंबई नं. ७.

किंमत ४ आणे

अनुक्रम २६९६६
विभाग बालवाङ्मय
क्रमांक २७६८
नों. दि. १३।९।६०

## — अर्पण पत्रिका —

माझी ही पहिली पुस्तिका, ज्यांनीं आम्हां मुलांना गोड गोष्टी सांगून रिझविलें त्या पूज्य साने गुरुजींना सादर अर्पण

— भालचंद्र पाठक

★

: प्रकाशक :

शां. चि. तानवडे

ताडदेव बुक डेपो,

मुंबई ७

★

: चित्रकार :

मुळगांवकर

★

: मुद्रक :

कृ. ना. सापळे

रामकृष्ण प्रिं. प्रेस,

मुंबई ४

★


## मुलांसाठीं गोष्टी

धीट मुलें ... ४ आणे

बालकहाणी ... ४ आणे

सत्यनारायणाची कथा ... ४ आणे

सत्यवान सावित्री ... ४ आणे

राजा हरिश्चंद्र ... ४ आणे

भक्त ध्रुव ... ४ आणे

श्रीकृष्ण ... ४ आणे

श्रीरामचंद्र ... ४ आणे

मुंबईचीं मंदिरें ... ४ आणे

सुधाराणी ... ४ आणे

चांदीची झांज ... ४ आणे

भक्त प्रल्हाद ... ४ आणे

वीर अभिमन्यु ... ४ आणे

नळदमयंती ... ४ आणे

मधुर मेवा ... ४ आणे

चतुर तेन्नालिराम ... ४ आणे

चतुर कालिदास ... ४ आणे

कबीर आणि कमाल ... ४ आणे

नामदेवाची कथा ... ४ आणे

पेंद्या व इतर गोष्टी ... ६ आणे

स्फूर्ति कथा ... ८ आणे

शनिदेव विक्रम ... ८ आणे

भारतांतील थोर लोक ... ८ आणे

पोलादी पुरुष (सरदार पटेल) ८ आणे

पुराणांतील गोड गोष्टी ... १॥ रुपया

ताडदेव बुक डेपो, मुंबई ७

अनुक्रम २६९६६
विभाग बालवाङ्मय
क्रमांक २७६८
नों. दि. १३/९/६०

## — अर्पण पत्रिका —

माझी ही पहिली पुस्तिका, ज्यांनीं आम्हां मुलांना गोड गोष्टी सांगून रिझविलें त्या पूज्य साने गुरुजींना सादर अर्पण

— भालचंद्र पाठक

# दोन शब्द

पूज्य सानेगुरुजींच्या गोड गोष्टी वाचून किती तरी युवकांचीं अंतःकरणें सुगंधित झालीं आहेत आणि होत राहतील. बालवाङ्मयांत गुरुजींचें कर्तृत्व आणि स्थान अनन्य आहे. त्यांचें वाङ्मय वाचून मुलांचा मनोविकास होतो तद्वतच मुलांच्या अंगचे वाङ्मय गुण वाढीस लागून गुरुजींच्या अनुकरणानें कथालेखन करण्याची बुद्धि आणि स्फूर्तीही त्यांना होते यांत नवल नाहीं.

श्री. भालचंद्र पाठक हे अशापैकींच एक तरुण आहेत. गुरुजींवर त्यांची भक्ति केवढी आहे तें ह्या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेवरून सर्वांना कळून येईल. पहिलें फूल देवाला वाहावयाचें तसें हें आपलें प्रथम लेखन त्यांनीं गुरुजींना वाहिलेलें आहे.

श्री. पाठक ह्यांनीं 'सत्यमेवजयते नानृतम्' ही थोर शिकवण मुलांच्या मनावर बिंबविण्यासाठीं ही कथा लिहिली आहे. विजय नांवाच्या एका सद्वर्तनी मुलाला त्याच्या सत्यप्रियतेमुळें आणि सेवाबुद्धीमुळें भाग्याचे दिवस कसे लाभले त्याचें बालबोध आणि चटकदार कथन त्यांनीं केलें आहे. तें वाचतांना मुलांना आनंद वाटेल आणि आपणही विजयासारखें सद्वर्तनी व्हावें अशी इच्छा होईल अशी अपेक्षा आहे.

—प्रकाशक

# दोन शब्द

पूज्य सानेगुरुजींच्या गोड गोष्टी वाचून किती तरी युव-कांचीं अंतःकरणें सुगंधित झालीं आहेत आणि होत राहतील. बालवाङ्मयांत गुरुजींचें कर्तृत्व आणि स्थान अनन्य आहे. त्यांचें वाङ्मय वाचून मुलांचा मनोविकास होतो तद्वतच मुलांच्या अंगचें वाङ्मय गुण वाढीस लागून गुरुजींच्या अनुकरणानें कथालेखन करण्याची बुद्धि आणि स्फूर्तीही त्यांना होते यांत नवल नाहीं.

श्री. भालचंद्र पाठक हे अशापैकींच एक तरुण आहेत. गुरुजींवर त्यांची भक्ति केवढी आहे तें ह्या पुस्तकाच्या अर्पण-पत्रिकेवरून सर्वांना कळून येईल. पहिलें फूल देवाला वाहा-वयाचें तसें हें आपलें प्रथम लेखन त्यांनीं गुरुजींना वाहिलेलें आहें.

श्री. पाठक ह्यांनीं 'सत्यमेवजयते नानृतम्' ही थोर शिकवण मुलांच्या मनावर बिंबविण्यासाठीं ही कथा लिहिली आहे. विजय नांवाच्या एका सद्वर्तनी मुलाला त्याच्या सत्यप्रि-यतेमुळें आणि सेवाबुद्धीमुळें भाग्याचे दिवस कसे लाभले त्याचें बालबोध आणि चटकदार कथन त्यांनीं केलें आहे. तें वाचतांना मुलांना आनंद वाटेल आणि आपणही विजयासारखें सद्वर्तनी व्हावें अशी इच्छा होईल अशी अपेक्षा आहे.

—प्रकाशक

# गोष्टींचीं पुस्तकें




## श्रीकृष्ण चरित्र

: लेखक :

बा. वा. फाटक

किंमत ४ आणे



## कबीर आणि कमाल

: लेखक :

सुरेश

किंमत ४ आणे

ताडदेव बुक डेपो, मुंबई नंबर ७

# चांदीची झांज

धानोरें गांवांत पुष्कळ देवळें असलीं तरी त्यांतलें ‘ रामाचें देऊळ ’ त्या पंचक्रोशींत फार प्रसिद्ध होतें. त्या देवळांत दरसाल ‘रामनवमी’चा उत्सव मोठ्या थाटामाटांत होत असे. सतत नऊ दिवस देऊळ माणसांनीं गजबजलेलें दिसायचें. यामुळेंच तेथील स्थानिक लोक या उत्सवाला ‘रामाची जत्रा’ म्हणत. खेळणीवाले, मिठाईवाले वगैरे फेरीवाले असायचेच. तसेंच झटपट फोटो काढून देणारे छायाचित्रकारहि असायचे. नाटक, सिनेमा, जादू इत्यादि करमणुकींना तर नुसता ऊत येई. कधीं कधीं तर असा भ्रम होत असे कीं, ‘ हेंच का तें कालचें धानोरें गांव ? ’ स्थानिक लोकांना जिथें असा भ्रम पडत असे तिथें नवख्याला न पडला तरच नवल !

याचें कारण एकच. या उत्सवानिमित्त जो तो आपलें कामधाम तात्पुरतें बाजूला ठेवून देत असे. मुलांनाहि उत्सवानिमित्त पंधरा दिवस सुटी मिळत असे. ही सुटी उत्सवाच्या अगोदर चार दिवस व मग पुढें सबंध उत्सव संपेस्तोंवर असे. त्या देवळाचा मालक ‘ अंतुकाका ’ म्हणजे गोडबोल्या माणूस. त्याच्या वाणींत साखरेपेक्षांहि गोडवा असे. पण तितकाच तो चिक्कू मारवाडी होता. हातांतून पैसा सुटेल तर शपथ ! आपलें काम जें दुसऱ्यांकडून करवून घ्यायचें

असेल तें गोड बोलून तो करून घेत असे. मुलांच्या बाबतींत तो असेंच करी. हें उत्सवाचें कार्य म्हणजे देवाचेंच कार्य आहे. तुम्ही देऊळ सजावण्यास मला मदत करा. म्हणजे देव तुम्हांला परीक्षेंत नेहमीं उत्तीर्ण करील, अशा गोड थापा मारून त्यांच्याकडून देवळाचीं झुंबरें साफ स्वच्छ करून लावून घेत असे. देवळांत व आवारांत झाडलोट करून घेत असे. सभामंडप उभारून घेत असे. बोलून चालून मुलेंच तीं. देवाला खूष करण्यासाठीं हीं सगळीं कामें मन लावून करीत असत. अशा रीतीनें अंतुकाका हा रामनवमी उत्सव गाजवीत असे. मुलांचे आई-बापहि मुलें 'देवाचें कार्य' करतात म्हणून दुर्लक्ष करीत. त्यामुळें अंतुकाकाचें मात्र पीक पिकत असे. फुकटांत सर्व करून मिळायचें.

यंदा मात्र धानोरें गांवचा उत्सव कसा होईल याची काळजी अंतुकाकाला लागली होती. कारण त्याचा मुलगा 'विजय' यानें गांवांतल्या प्रमुख मुलांपैकीं मुख्याशींच, म्हणजे जयंताशींच भांडण केलें होतें. त्यामुळें मुलांत दोन गट पडले होते. एक गट विजयचा तर दुसरा गट जयंताचा. दोघेहि हुशार, पण जयंत समंजस होता. विजय मगरूर. जयंताला आपल्य परिस्थितीची जाणीव होती. आपल्या घरची गरिबी, आई वडील आपल्यासाठीं कष्ट करताहेत, आपण लवकर व खूप शिकून पुष्कळ पैसे मिळवावे व आपल्या आईवडिलांचे श्रम सार्थकीं लावावे, असें त्याला वाटे. याच्या उलट विजय. आपले वडील हे धानोरें गांवचे जणूं राजेच व आपण त्यांचा मुलगा, या उद्दाम भावनेनें तो सर्वांशीं तुसडेपणानें वागे.

यामुळेंच या दोघांचें बिनसलें होतें. दोघेहि एकमेकांना टाकून बोलले होते. परंतु जसजसा उत्सव जवळ येत चालला तसतसा अंतुकाका बेचैन होऊं लागला. कारण देवळाचीं सर्व कामें फुकटांत होणार कशीं ?

एक दिवस शाळा चालू असतांनाच विजय जयंताच्या वर्गांत गेला. त्यानें मास्तरांच्या मध्यस्थीनें जयंताशीं तडजोड केली. मग त्यानें सर्व मुलांना आपल्या गोड भाषेंत देवाची महति व कार्याचें महत्त्व पटवून दिलें. शेवटीं सर्व मुलांना व मास्तरांना उत्सवाचें आमंत्रण दिलें. तसेंच सर्व मुलांना उत्सवास हातभार लावण्यास या म्हणून पुनः पुनः सांगून निघून गेला.

बिचारीं भोळीं मुलेंच तीं ! तीं आपलीं सर्व उत्सवाच्या तयारीला आलीं. अंतुकाकाच्या घरांतहि 'पाहुणे मंडळी' ची वर्दळ जोरांत सुरू झाली. अंतुकाका घरांत पाहुण्यांची बडदास्त राखीत होता आणि देवळांत मुलांकडून 'करून' काम करून घेत होता. हें सर्व बघून पुनः त्याला पाहुण्यांच्या मुलांच्या दांडगाईला आळा घालावा लागे. यामुळें त्याची फारच तारांबळ उडत असे. मुलांनीं देवळाची साफसफाई केली. झुंबरें लख्ख पुसून काढलीं. रंगीत कागदाचीं रंगीबेरंगीं तोरणें लावून देऊळहि सजविण्यास सुरवात केली. कारण रामनवमी-च्या उत्सवास उद्यांपासून सुरवात होणार होती. सर्व मुलांनीं अगदीं तहान-भूक, चहा-पाणी वगैरे सर्व नैमित्तिक कामें बाजूला ठेवून या देवाच्या कार्याला जोरानें मदत करण्यास

सुरवात केली. बऱ्याच रात्रीपर्यंत देऊळ सजवून मगच तीं आपापल्या घरीं गेलीं.

जयंताहि घरीं आला. आई बिचारी त्याची वाटच पहात होती. तो आल्यावर त्याला ती म्हणाली, " अरे जया ! काय हे तुझे कपडे ? आणि डोकें बघ आरशांत धुळीनें किती माखलेलें आहे तें ! आतां मी पाणी तापवितें. मग तूं स्वच्छ आंघोळ कर, मग आपण जेवूंया." जयंतालाहि हा विचार पटला. त्यानें " बरें " म्हणून आईला सांगितलें व उद्यांच्या उत्सवाची कल्पनाचित्रें तो आपल्या मनांत रंगवूं लागला. तो आणखी किती वेळ बसला असता कोण जाणे, पण आईची हांक कानीं पडतांच तो उठून स्वयंपाकघरांत गेला आणि तापलेलें पाणी बादलींत ओतून घेऊन मागील अंगणांत आंघोळीस गेला. लवकरच स्नान आटोपून पायजमा घालून तो जेवावयास बसला. आई अगोदरच सुग्रण व त्यांतून तो भुकेलेला. चटणी–भाकरीचें जेवण तो अगदीं यथेच्छ जेवला. मग हात त्यानें धुऊन सदरा घातला. शतपावली केली. 'रामरक्षा' म्हणून तो झोपीं गेला. अगदीं गाढ झोपला तो. त्याच्या घरचें वळणच शिस्तीचें होतें. तोहि आज्ञाधारक. सहसा बाहेरच्या कागाळ्या घरीं येतील इतकी दांडगाई तो कधींच करीत नसे.

उत्सवाच्या दिवशीं जयंत लवकर उठला. स्नान केलें. नमस्कार घातले. स्वच्छ कपडे करून तो देवळांत गेला. त्याचे आई-वडीलहि सर्व कामें उरकून कीर्तन ऐकण्यासाठीं देवळांत गेले.

२८६७



देवळाच्या आसपास मिठाईचीं दुकानें, मोहक खेळण्यांनीं नटलेल्या चारचाकी फेरीवाल्यांच्या गाड्या मुलांना मोहवीत होत्या; त्यांच्या नेत्रांना सुखवीत होत्या. अधून मधून एकादा मुलगा कसलें तरी खेळणें घेण्यास गाडीजवळ जाई तेव्हां त्याच्या सहकाऱ्याचें कोंडाळें त्या मुलाभोंवतीं व गाडीभोंवतीं जमे. " शिरप्या ! तूं ही पिपाणी घेरे ! " मुलांपैकीं एकजण सूचना करी. शिरप्याला ती मान्य होऊन तो ती घेई व 'बा' ला पैसे देण्यास सांगे. 'बा' हि मग लेकाचें कौतुक करून पिपाणीचे पैसे फेरीवाल्यास चुकते करी. असें आनंदोत्सवाच्या दिवसांत धानोरें गांवांत चाले. त्यांतील लोकांत एक प्रकारचा उत्साह संचारे. सर्वांना हा उत्सव म्हणजे एक आनंदाची पर्वणीच वाटे. सारे लोक नऊ दिवस तरी इतके आनंदांत असत कीं, " जगीं सर्व सुखी असा कोण आहे ? " या उक्तीला धानोरें गांव अपवाद आहे कीं काय असा भ्रम पडे.

नऊ दिवसांत देऊळ गजबजलेलें दिसत होतें. देवळांत दररोज भजन, प्रवचन, कीर्तन, आरती वगैरे नित्य नैमित्तिक कार्यक्रम यथासांग पार पडतांना दिसून येत होते. रामजन्माचें कीर्तन मात्र उद्यां दुपारचें होणार होतें. मग उत्सवाची समाप्ती महाप्रसाद वांटून होणार होती. आठ दिवस कसे गेले तें कोणाला कळलेंहि नाहीं.

रामजन्माचें कीर्तन स्वतः अंतुकाका करीत असत. त्याप्रमाणें यंदाहि त्यांनीं तें आपल्या सुरस वाणींत केलें. कीर्तन संपलें. अगोदर वांटलेलीं फुलें व गुलाल रामरायावर उधळला गेला.

महाप्रसाद घेऊन लोक आपापल्या घरीं गेले. उत्सव संपला. हळूहळू पाहुण्यांनीं आपला मुक्काम हलविला. सर्व मुलें व अंतुकाका शेवटच्या आवराआवरीला लागलीं. पोशाख, चांदीचीं उपकरणें ठेवण्यास सुरवात झाली.

इकडे जया वगैरे मुलांनीं दरवाजावरचे केळीचे खांब, फुलांच्या माळा काढण्यास सुरवात केली. तोंच आंतून अंतुकाका सभामंडपांत येऊन गरजले, " काय रे पोरांनो ! चांदीची झांज कुठें आहे ? जया, मला पक्कें आठवतें कीं, मी कीर्तन आटोपल्यावर ती तुझ्याजवळ दिली होती. कुठाय ती ?" बिचारा जया या बोलण्यानें घाबरून गेला. तरी पण धीर धरून म्हणाला, " काका, तुम्ही ती झांज माझ्याजवळ दिली नाहीं. दुसऱ्या कुणाकडे तरी दिली असेल. पहा नीट आठवून. मात्र ती माझ्याजवळ कांहीं तुम्हीं दिलेली नाहीं. "

" गधड्या ! मलाच वर आठवणीचे धडे शिकवतोस ! लाज नाहीं वाटत ! " असें म्हणून रागानें काकानीं जयाच्या चार पांच कानशिलांत भडकविल्या. जयाला रडूं कोसळलें. त्यानें काकांच्या तावडींतून आपली सुटका करून घेतली. गालांवर ओघळणारे अश्रु आवरून त्यानें दांत-ओठ चावून काकांना करड्या स्वरांत बजाविलें, " काका ! उगाच माझ्यावर आळ घेऊन मला बडविलेंत. पण मी निक्षून सांगतों, अगदीं या रामाची शपथ घेऊन सांगतों कीं; मी ती झांज घेतली नाहीं. हे पहा माझे खिसे. " त्यानें आपले खिसे दाखविले. पण

त्यांत ती झांज नव्हती. त्याच्या सर्व मित्रांनीं " आम्हीं झांज घेतली नाहीं." असें सांगून ते जयंताबरोबर निघाले व आपल्या घरीं गेले.

घरीं गेल्यावर मात्र जयंतानें आंथरूण धरलें. कारण उत्सवाची मेहनत व वर हा मिळालेला महाप्रसाद ! त्याला सडकून ताप भरला व तो तापांत बरळूं लागला. " मी ती झांज घेतली नाहीं काका, मला मारूं नका." बिचारी आई खूपच घाबरली. तिनें त्याच्या सोबत्यांपैकीं एकाला बोलाविलें व डॉक्टरला आणण्यासाठीं पाठविलें. डॉक्टरनें आल्यावर धीर दिला. जयाला इंजेक्शन देऊन झोपेचें औषध दिलें. जयाला झोंप लागली. डॉक्टर औषध देऊन निघून गेले. बिचारी आई अश्रु ढाळीत जयाच्या अंथरुणाजवळ रामाची करुणा भाकीत होती.

इकडे काकांनींहि मुलांना शिव्या देत देत हळूहळू सर्व उरकलें. दुपारीं तीन साडेतीनचा सुमार असेल. काका जेवायला बसण्याच्या तयारींत होते. इतक्यांत पोस्टमनची हांक काकांच्या कानीं पडली. म्हणून ते मंडपांत आले. "कायरे पवार ! काय आणलेंस तें ?" काकांनीं पोस्टमनला विचारलें. " विशेष कांहीं नाहीं काका ! हे तुमचें रजिस्टर पार्सल आहे व हें पत्र. एवढी यावर सही करून द्या पोंचल्याची." असें म्हणून पवार पोस्टमननें काका सोवळ्यांत असल्यामुळें तें पार्सल, पत्र, नोंदबुक व पेन्सिल जवळ ठेविली. काकानीं सही करून नोंदबुक व पेन्सिल परत केली. पोस्टमन

गेल्यावर सभामंडपाचें दार लावून घेतलें व तें पार्सल फोडलें. तों त्यांतून हरवलेली चांदीची झांज निघाली! नंतर काकांनीं पत्र वाचावयास घेतलें. त्यांत मजकूर असा होता—

श्रीयुत रा. रा. अंतुकाका यांना–

स. न. वि. वि.

आमच्या मुलानें आपली चांदीची झांज कीर्तन संपल्यावर घेतली. ती आम्हांस न कळवितां तो घेऊन आला. ती परत करीत आहोंत. आपण याबद्दल आम्हांस क्षमा करावी.

कळावें, लोभ असावा ही विनंती.

आपला,

रामराव.

रामराव हे अंतुकाकांकडे पाहुणे आले होते. त्यांच्या मुलानें ती झांज नेली होती. अंतुकाकांना पत्र वाचून मेल्याहून मेल्यासारखें झालें. जयाला आपण उगीचच मारलें म्हणून त्यांचें मन त्यांना टोंचूं लागलें. त्यांनीं सोवळें सोडलें, ओवळें नेसलें. सदरा घातला. पायांत जोडे घालून ते तडक जयाच्या घरीं आले.

जयानें आंथरूण धरलेलें पाहून त्यांना भडभडून आलें. ते गहिंवरून म्हणाले, " काकू, मला क्षमा करा. मी उगाचच जयाला मारलें. " " अहो, पण असें झालें तरी काय क्षमा मागण्यासारखें ? " जयाच्या आईनें अंतुकाकांना विचारलें.

अंतुकाकांनीं झालेली सर्व हकीकत त्यांना सांगतली. ती पुरी होते न होते तोंच जया उठला. काकांनीं त्याला प्रेमानें थोपटलें. ते म्हणाले, " जया ! माझी झांज मिळाली हो मला. मी उगाच तुला मारलें. लवकर बरा हो बाळ. आई-वडिलांचें नांव काढशील बेटा." मग सर्व खुलासा करून ते घरीं निघून गेले.

इकडे वडील कामावरून आल्यावर त्यांना सर्व हकीकत समजली. त्या दोघांही माता-पित्यांनीं त्याला शाबासकी दिली. वडिलांना उद्देशून आई म्हणाली, " माझा जया गुणी आहेच मुळीं. तो आतां लवकर बरा होईल. होय ना रे ? " असें आईनें जयंताकडे पाहून म्हटलें. त्यावर जयानें मान हालवून होय म्हटलें व आईच्या कुशींत तोंड लपविलें. वडील म्हणाले, " बाबारे, आपण नेहमीं खऱ्यानें वागावें. तसें वागतांना आपल्यावर जरी कितीहि संकटें आलीं तरी हरकत नाहीं. आपण त्यांतून ईश्वरकृपेनें पार पडतों. पण सामान्य माणसें संकटांना घाबरतात व खरें सोडतात. तसें करतां कामा नये. "

नंतर जयाचे वडील डॉक्टरकडे गेले. त्यांना जयंताच्या तब्येतीबद्दल विचारायचें होतें. येतांना जयंतासाठीं मोसंबी आणायचीं होतीं. घरांतून ते तसें सांगून निघाले होते. ते डॉक्टरना त्यांच्या घरीं जाऊन भेटले. डॉक्टर आपल्या पत्नीला जयंताबद्दल सांगत होते. इतक्यांत जयंताचे वडील आप्पासाहेब तेथें जाऊन पोंचले.

" ओहो ! या आप्पासाहेब. आम्हीं दोघं आतां तुमच्या

जयाबद्दलच बोलत होतों. बरं पण तें राहूं द्या. जयंताची झोप वगैरे काय म्हणते ? तो उठला कीं नाहीं ?" डॉक्टरांनीं विचारलें.

यावर आप्पासाहेब म्हणाले, " डॉक्टरसाहेब, तुम्ही वेळींच औषध व इंजेक्शन दिलेंत म्हणून माझा जयंता मला परत भेटला; नाहीं तर........" " तें जाऊं द्या हो. संध्याकाळच्या वेळेला असलं कांहीं अभद्र नका बोलूं आप्पासाहेब." डॉक्टरीणबाई म्हणाल्या व त्यांनीं विचारलें, " जयंताची तब्येत आतां कशी आहे ? बाकी आहे हुशार मुलगा हं ! नांव काढील तो तुमचं, आप्पासाहेब."

आपल्या मुलाचें गुणवर्णन ऐकून आप्पांची कळी खुलली. साहजिकच आहे. आपल्या मुलाविषयीं चारचौघांनीं चांगलें म्हटलें कीं प्रत्येक आई, बापाला आनंद होणारच. मग त्याला अप्पासाहेब तरी कसे अपवाद असतील ? त्यांनीं जयंताच्या तब्येतीचा सर्व तपशील निवेदन केला. नंतर त्यांच्यांत अंतुकाकांच्या उत्सवाबद्दल चर्चा सुरू झाली.

" बाकी कांहीं म्हणा आप्पासाहेब ! वास्तविक अंतुकाका हा जो उत्सव करतो तो सर्वथैव मुलांच्या व इतरांच्या जिवावर व टिमकी मात्र स्वतःची वाजवितो ! मला हें मुळींच पसंत नाहीं. हां, आतां तुम्हीं म्हणाल, रजा असते मुलांना, तेव्हां देवाचें कार्य केल्यानें कोणाचें वाईट का होणार आहे ? पण त्याचें फळ जर जयंताला मिळालं असं मिळेल तर तो उत्सव व तें

देवाचें कार्य कितीहि मन लावून केलं तरी तें निष्फळच ठरेल, असं मला वाटतं. काय? तुम्हांला काय वाटतं?" डॉक्टरांनीं आपले विचार व्यक्त करून आप्पासाहेबांना दाखविले.

आप्पासाहेब धीरगंभीर आवाजांत म्हणाले, "डॉक्टर-साहेब, तुम्हांला अजून धानोऱ्यांतील लोकांचा स्वभाव माहीत नाहीं. मला तुमचे विचार व मतें पटतात. पण इथल्या लोकांत मला दिवस काढावयाचे आहेत. मी मात्र मनाशीं ठरविलें आहे कीं जयंता पुढच्या वर्षी प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेस बसणार आहे तेव्हां त्याला कुठल्याहि सभा-सम्मेलनांत अगर उत्सवांत एक वर्षभर तरी भाग घेऊं द्यायचा नाहीं. त्यानें निदान आमच्या जिल्ह्यांत तरी पहिला क्रमांक मिळविला पाहिजे. माझी खात्री आहे. माझा जया माझी इच्छा खात्रीन पुरी करील. बरं तें असो. त्याच्या आजारी-पणाचं कारण तरी काय?"

त्यावर डॉक्टर हंसून म्हणाले, "तुम्हीं कांहीं घाबरूं नका आप्पासाहेब. मी त्याला चार दिवसांत बरा करतों."

हें ऐकून आप्पांना जरा बरें वाटलें. नंतर त्यांनीं विचारलें, "बरं तर; मग मी येऊं आतां?"

डॉक्टरांनीं "हो" म्हणून मान हालविली.

रात्रीं आठच्या सुमारास आप्पा डॉक्टरांच्या घरांतून बाहेर पडले ते मंडईंत गेले. चांगलीं रसरशीत मोसंबीं घेतलीं व पैसे चुकते करून ते हळूहळू घरीं आले.

घरीं जयंता व त्यांची पत्नी सुशीलाबाई आप्पांची वाटच पहात होतीं. ते यायच्या आंत सुशीलाबाईनीं सर्व स्वयंपाक तयार करून ठेविला होता. आप्पांनीं जयंताला मोसंबीं दिलीं व हातपाय धुतले. इतक्यांत पानें मांडल्याची वर्दी घरांतून मिळाली व ते जेवावयास गेले.

जेवत असतांना, डॉक्टरांच्या घरीं झालेलें सर्व संभाषण त्यांनीं आपल्या पत्नीला सांगितलें व ते जयंताविषयींचीं मनोराज्यें बोलूं लागले. जेवण आटोपलें, ते जया नि सुशीलाबाई थोड्या वेळानें झोपीं गेलीं.

या गोष्टीला चार–सहा दिवस होऊन गेले. जयंताला दोन दिवसांपूर्वींपासूनच बरें वाटूं लागलें होतें. पण थोडा अशक्तपणा वाटत होता. म्हणून तो अजून शाळेंत जायला लागला नव्हता. बरोबर एक आठवड्यानें तो शाळेंत गेला त्यापूर्वींच त्याचे जिवलग मित्र त्याला आजारीपणांत भेटले होते. शाळेंत गेल्यावर मास्तरांनींहि त्याच्या प्रकृतीची चौकशी केली. विजयनेंहि त्याला मोठ्या आपुलकीचा आव आणून त्याच्या प्रकृतबिद्दल विचारलें.

हळूहळू तो शालेय जीवनांत रमला. तो असाच एका शनिवारीं शाळेंतून घरीं आल्यावर जेवून अभ्यासाला बसणार होता. इतक्यांत दाराशीं कोणीतरी हांक मारल्याचा त्याला भास झाला. तो उठून पुढच्या अंगणांत गेला. दार उघडून पाहातो तों खरेंच. एक सुमारें पन्नाशीच्या वयाचा गृहस्थ दाराशीं उभा असलेला त्याला दिसला. ओळखीचा ना पाळखीचा.

जयंतानें त्याला विचारलें, " आपणाला कोण पाहिजे बाबा ? " त्यावर त्या गृहस्थानें त्याला न्याहाळून पाहिलें. मग मृदु आवाजांत विचारलें, " बाळ ! तुझ्या घरांत वडील माणूस कोणी आहे का ? असल्यास त्यांना हांक मार. " तेव्हां जयंतानें पुढील अंगणांतूनच आईला हांक मारली व कोणी गृहस्थ आल्याचें सांगितलें. आई मागल्या अंगणांत भांडीं विसळीत होती. ती हात धुवून खोचलेला ओचापदर सारखा करून पुढील अंगणांत आली. तिनें त्या गृहस्थास विचारलें, " कोण आपण ? " त्यावर त्या गृहस्थानें उत्तर दिलें, " बाई, मी एक भुकेलेला वाटसरू आहें. आपण मला थोडेंसें खायला दिलेंत तर बरें होईल. मला थोडेंसें ज्योतिषहि येतें. मी ह्या मुलाचें भविष्यहि सांगेन. " त्या ज्योतिष्याची ती विनंती ऐकून जयाच्या आईला दया आली. तिनें घरांत जी थोडीफार भाजी भाकरी होती ती त्याला दिली. ती खाऊन पाणी पिऊन त्यानें आनंदानें ढेकर दिला व हात धुवून समाधानानें जयाचा हात पहाण्यास सुरवात केली. तो नीट पाहिल्यावर त्यानें विचारलें, " बाई, याच्यावर कधीं चोरीचा आळ आला होता का ? " मग आईनें त्याला मागील सर्व हकीकत सांगितली. मग इतर भविष्य सांगून तो म्हणाला, " बाई, या मुलाच्या नशिबांत अकस्मात् धनलाभ आहे. " हें ऐकून जयाची आई म्हणाली, " बरं बाबा ! तुझ्या तोंडांत साखर पडो ! तसं कांहीं झालं तर तुला मी विसरणार नाहीं. "

सगळें ज्योतिष सांगून झाल्यावर तो ज्योतिषि निघून गेला. घरीं वडील आल्यावर जयंतानें व त्याच्या आईनें त्यांना सर्व हकीकत सांगितली. त्यावर ते हंसून म्हणाले, " हें पाहा, हा धनलाभ झाला तरी माणसानें श्रम करण्याचें सोडूं नये. त्यांत जी कमाई होईल ती खरी श्रमाची संपत्ति. बरें तें जाऊं द्या. आणखी कांहीं विशेष ? " त्यावर जयाच्या आईनें मान हालवून 'नाहीं' म्हटलें व ती चहा करण्यास आंत निघून गेली.

या गोष्टीला बरेच दिवस झाले. हळूहळू जयंता व त्याची आई त्या ज्योतिष्याचें भाकीत विसरूनहि गेलीं. शाळेंत एक नवीन घडामोड घडून येणार होती. त्यांच्या वर्गातर्फे शाळेचें असें एक नवीन हस्तलिखित मासिक निघणार होतें. त्याविषयीं मुलें, मास्तर व मुख्याध्यापक यांचा विचार चालला होता. मुलांचा प्रतिनिधी म्हणून जयंता निवडून आला. मास्तरांपैकीं मराठीचे लेले मास्तर त्या मंडळांत, होतेच. हस्तलिखिताची तयारी जोरांत सुरू झाली. जयंतानें हस्तलिखित अधिकांत अधिक आकर्षक बनविण्यासाठीं खूप मेहनत घेतली. रात्रीचा दिवस केला. त्याचे मित्रहि त्याला या कामीं मदत करीत. परंतु जयावर विद्यार्थीप्रतिनिधी या नात्यानें मोठी जबाबदारी होती. म्हणून तो स्वतः फारच मेहनत घेई.

धानोरेंसारख्या खेडेगांवांत तरी ही घटना अपूर्व व कांहींशी नवलाईची मानली गेली तर नवल काय ? हळूहळू सर्व हस्तलिखित मासिक संपूर्ण तयार होत आलें. या हस्त-

लिखिताचा प्रकाशन समारंभ तालुक्याचे एक प्रसिद्ध पुढारी व कार्यकर्ते ह्यांच्या हस्तें करण्याचें निश्चित झालें. शाळेच्या मुख्याध्यापकांनीं त्यांना तसें विनंतीपत्र पाठविलें. त्यांनींहि येण्याचें आनंदानें मान्य केलें.

गांवांत शाळेनजिकच्या मैदानांत एक भव्य मंडप उभारला गेला. सर्व मुलांनीं जमीन वगैरे साफ केली. मंडप रंगीबेरंगी कागदी तोरणांनीं सुशोभित केला. ठिकठिकाणीं सुविचारांचे तक्के लाविले. जाण्यायेण्याचा रस्ताहि व्यवस्थित साफ केला. उद्यांचा दिवस म्हणजे धानोरेंसारख्या गांवांत एक प्रकारचा संस्मरणीय दिवस होता.

आज सगळीकडे उत्साहाचें वातावरण खेळत होतें. लहान थोर सर्व अगदीं उत्साही दिसत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद नाचत होता. विशेषतः मुलांना तर स्वर्ग दोनच बोटें उरला होता ! समारंभाची वेळ झाली. सर्व मुलांचे पालक, भावंडें, मास्तर व इतर गांवकरी यांचा समुदाय मंडपांत हजर झाला.

ठरल्या वेळीं सुप्रसिद्ध पुढारी आले. त्यांनीं अगोदरच हस्तलिखित नीट वाचलें होतें. त्यांतील जयंताची कविता त्यांना फारच आवडली. त्याचा त्यांनीं आपल्या भाषणांत मोठ्या प्रेमानें उल्लेख करून जयंताचा गौरव केला. भाषणाचा आशय असा होता,

" आपल्या धानोरेंसारख्या गांवांत एक मुलगा आहे. तो म्हणजे धानोरेचें गुप्त धन. त्याला शिकवा, शहाणा करा. मग

तो तुमच्या गांवाचा उद्धार करील. तुमचें ऋण फेडील. मोठीं माणसें करूं शकणार नाहींत, असें कार्य तो करून दाखवील. त्याच्या कवितेंत त्याच्या मनांतील तळमळ दिसून आली. तो आपल्या गांवासाठीं वेळप्रसंग पडल्यास फार मोठा त्यागहि करील. याचा प्रत्यय म्हणजेच हें सुंदर हस्तलिखित. या मासिकाच्या नांवाप्रमाणें या मुलाचा खरा " उदय " होवो, आशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों."

त्याच्या शिक्षकांनीं चांगल्या प्रकारें मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांनीं प्रशंसोद्गार काढिले. शेवटीं उत्तेजनार्थ त्यांनीं जयंताला पंचवीस रुपये बक्षीस म्हणून दिल्याचें जाहीर केलें. तेव्हां सभामंडपांत टाळ्यांचा कडकडाट घुमला.

मुलाचें गुणवर्णन ऐकून जयंताचे वडील आप्पा व आई सुशीलाबाई यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळूं लागले. त्यांच्या जवळच डॉक्टर बसले होते. ते म्हणाले, " आप्पासाहेब ! घरीं गेल्यावर जयाची दृष्ट काढा बरं ! नाहीं तर विसराल." आप्पांनीं यावर नुसतें स्मित करून सुशीलाबाईंकडे पाहिलें.

समारंभ संपला. आप्पा, सुशीलाबाई व जया घरीं यावयास निघालीं. मिळालेलें बक्षीस वाटेंत जयंतानें वडिलांच्या स्वाधीन केलें. घरीं आल्यावर जयाची दृष्ट काढण्यांत आली. रामाला पेढे वाटण्यांत आले. अशा रीतीनें तो सुखद समारंभ पार पडला.

आप्पा व सुशीलाबाई मात्र या बक्षिसाचें काय करावें याचा बराच वेळ खल करीत होतीं. मुलानें मिळविलेल्या बक्षिसामुळें त्यांना आनंद वाटला. कृतकृत्यता वाटली.

वरील गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यावर एका रविवारीं सकाळीं जयाच्या काय मनांत आलें कुणास ठाऊक, त्यानें आपली माडीवरची कुदळ घेतली व सरळ मागच्या अंगणांत बाग करायची म्हणून जमीन खणून सपाट करण्याचा सपाटा चालविला. खणतांना मध्येंच जमिनींत कुद्‌ळ जी घुसली ती तो घामाघूम झाला तरी निघेना. शेवटीं वडिलांच्या मदतीनें ती कुद्‌ळ निघाली. तिच्याबरोबर एक पितळी टोपहि निघाला ! त्यांत सगळीं सोन्याचीं नाणीं, मोहरा वगैरे होत्या !

आपले दारिद्र्याचे, गरिबीचे दिवस संपले म्हणून आप्पांना फार आनंद झाला. आई व जयंता यांना ज्योतिष्याचें भाकीत खरें ठरलें याचा आनंद झाला. त्यांनीं सर्व गावकऱ्यांना पेढे वांटले. सर्वांनीं जयंताचें गोड कौतुक केलें.

त्या मिळालेल्या सोन्याच्या नाण्यांचे जयाच्या वडिलांनीं रुपये केले. त्याच गांवांत एक मोठेंसें दुकान घातलें. दुकानाला " जयंत स्टोअर्स " असें नांव दिलें.

या गोष्टीला बरेच दिवस झाले. वडिलांनीं आपली नोकरी सोडली व सर्व लक्ष दुकानांत घालण्यास सुरवात केली. हळूहळू धंद्यांत जम बसूं लागला. त्यांना खूप पैसा मिळूं लागला.

एके काळीं असलेल्या गरिबीचा आतां मागमूसहि उरला नव्हता.

एके दिवशीं तो ज्योतिषी आपल्या भाकिताची प्रचिति पाहाण्यासाठीं आला. सर्वांनीं त्याला ओळखलें. त्याला तिथेंच राहाण्यासाठीं विनविण्यांत आलें. पण त्यानें ऐकलें नाहीं. जातांना गहिंवरून तो सर्वांना म्हणाला, “ मी जातों याबद्दल तुम्हीं वाईट वाटून घेऊं नका. आप्पा, तुमचा जया असाच उत्तरोत्तर हुशार, प्रामाणिक व लौकिकवान बनून तुमचें नांव काढील ! तें त्याच्या नशिबांतच आहे. असो. मी जातों. तत्पूर्वी सर्वांना सुखानें, प्रामाणिकपणानें व समाधानी वृत्तीनें राहा एवढेंच सांगतों. ” असें सांगून तो ज्योतिषी निघून गेला.

---

शनिदेव आणि विक्रम

गोष्टीरूप श्रीशनिमाहात्म्य

किंमत ८ आणे

८२३८ बावा

अवश्य वाचा

ताडदे ... मुंबई ७

IRBK-0108238

IRBK-0108238